## -: प्रेस नोट दिनांक- ०४/०१/२०२१ :-

**अरविंद मधुकर लबदे, वय ४३, नाईक(शिपाई), विद्युत निरीक्षक कार्यालय, कोल्हापूर, रा. प्लॉट नं. ६०८, माने कॉलनी, तामगांव, ता. करवीर, जि. कोल्हापूर यांनी लाच मागणी करून लाच स्विकारलेबाबत....**

---

तक्रारदार यांना त्यांचे पत्नीचे नावे आवश्यक विद्युत ठेकेदारीचा परवाना मुंबई येथील कार्यालयात जावुन मिळवुन देणेसाठी विद्युत निरीक्षक कार्यालयातील शिपाई लबदे यांनी तक्रारदार यांचेकडे १३,०००/- रू. लाचेची मागणी केली होती. त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दि. ०४/०१/२०२१ रोजी तक्रार दिली आहे.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे विद्युत निरीक्षक कार्यालयातील शिपाई लबदे यांचे लाचेच्या मागणीची पडताळणी शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष केली असता, पडताळणीमध्ये शिपाई लबदे यांनी १३,०००/- रू. लाचेची मागणी केलेचे निष्पन्न झाले.

पडताळणी कारवाईप्रमाणे विद्युत निरीक्षक कार्यालयातील शिपाई लबदे यांचेविरूध्द विद्युत निरीक्षक कार्यालय, पागा बिल्डींग, भवानी मंडप येथे सापळा कारवाई आयोजित केली असता, शिपाई लबदे यांनी मागणी केलेप्रमाणे १३,०००/- रू. लाच रक्कम स्विकारल्याने त्यांचेविरूध्द यशस्वी सापळा कारवाई करणेत आलेली आहे.

आरोपी लोकसेवक अरविंद मधुकर लबदे, वय ४३, नाईक(शिपाई), विद्युत निरीक्षक कार्यालय, कोल्हापूर, रा. प्लॉट नं. ६०८, माने कॉलनी, तामगांव, ता. करवीर, जि. कोल्हापूर यांचेविरूध्द जुना राजवाडा पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस उपआयुक्त/अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री. आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, श्री. जितेंद्र पाटील, पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, सफौ. संजीव बंबरगेकर, पोहेकॉ शरद पोरे, पोना कृष्णात पाटील, पोकॉ रुपेश माने व मयुर देसाई, चालक पोहेकॉ विष्णु गुरव, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**

**२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**

**३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**

**४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४, ५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**